# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- नागपूर शहरातील वाहतुक नियंत्रक व ब्लिंकरची देखभाल,

**{विद्युत विभाग}** सुस्थिती व दुरुस्ती करण्याबाबत.

नागपूर शहरातील वाहतुक नियंत्रक व ब्लिंकरची देखभाल, सुस्थिती व दुरुस्ती करण्याकरीता रू. 50,00,000/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. उपरोक्त विषयांकित कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा बोलावून काम करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:-
1) सदर कामाचा खर्च पद क्र. A22501730819 (जुना-373) अंतर्गत करावयाचा आहे.
2) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 55/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 22/05/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (विद्युत), विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील वाहतुक नियंत्रक व ब्लिंकरची देखभाल, सुस्थिती व दुरुस्ती करण्याकरीता रू. 50,00,000/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. उपरोक्त विषयांकित कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा बोलावून काम करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.